**दिनेश**
**बिल्डींग मटेरियल सप्लायर्स**
खडी, क्रेशेन, वन फोर, डबर, वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक
(सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368, 9860330587

दैनिक
# आकर्षण
संपादक : विजय सांगळे




वर्ष ५ । अंक २७३ । गुरुवार ३० जुलै २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322

## एक महिन्यापासून रायगव्हाण गाव अंधारात

### महावितरणाच्या हलगर्जीपणामुळे ग्रामस्थ संतप्त, आंदोलनाचा इशारा

**दैनिक आकर्षण । केशव कातोरे**

**बेलवंडी–** श्रीगोंदा तालुक्यातील रायगव्हाण गाव गेल्या तब्बल एक महिन्यापासून अंधारात असून महावितरण प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे गावकऱ्यांचे जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. गावातील जळालेला वीज रोहित्र (डीपी) बदलण्यासाठी संबंधित विभागाने आतापर्यंत दोन डीपी बसवल्या. मात्र पहिली डीपी अवघ्या पाच मिनिटांतच निकामी झाली, तर दुसरी डीपी बसवल्यानंतर वीजपुरवठा सुरूच झाला नाही. त्यामुळे संबंधित विभागाने नादुरुस्त वीज रोहित्र बसवल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

गेल्या महिनाभरापासून गावात वीज नसल्याने पिण्याच्या पाण्याची तीव्र समस्या निर्माण झाली आहे. मोबाईल चार्ज होत नसल्याने अनेकांचे मोबाईल बंद पडले असून परिसरात मोबाईल नेटवर्कचीही समस्या असल्यामुळे नागरिकांचा बाहेरील संपर्क तुटला आहे.

विद्यार्थ्यांना अभ्यास करता येत नसल्याने त्यांच्या शैक्षणिक नुकसानात भर पडत आहे. रायगव्हाण परिसरात मोठ्या प्रमाणात ऊस शेती व वनक्षेत्र असल्याने बिबट्याचा दिवसा आणि रात्रीही मुक्त संचार असतो. यापूर्वी अनेक वेळा बिबट्याने पाळीव जनावरांवर हल्ले केले आहेत. अशा परिस्थितीत गाव संपूर्ण अंधारात असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून महिला, ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.तसेच या भागामध्ये चोऱ्यांचे प्रमाणही वाढले आहे.

गावातील प्रसिद्ध जगदंब देवी मंदिरात दररोज आरती होत असते. मात्र वीज नसल्यामुळे मंदिरही अंधारात असून धार्मिक कार्यक्रमांवरही परिणाम झाला आहे. गावकऱ्यांना रोजच्या दैनंदिन कामांमध्ये मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

> येत्या दोन दिवसांत जर रायगव्हाण गावातील विजपुरवठा सुरळीत झाला नाही तर ग्रामस्थांना बरोबर घेऊन तीव्र आंदोलन केले जाईल असा इशारा कुकडी चे माजी संचालक बाळासाहेब पठारे यांनी दिला.

> ग्रामस्थांचे म्हणणे ऐकुन तात्काळ माहिती वरीष्ठ कार्यालयाला दिली होती येत्या दोन दिवसांत रायव्हाण येथील विजपुरवठा सुरळीत होईल काही तांत्रिक अडचणी असतील त्या ही दुर केल्या जातील.
> –**गणेश चौधरी** सहायक अभियंता विद्युत महावितरण.

ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, महावितरणाच्या संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांकडे अनेक वेळा तक्रारी करूनही कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही. वारंवार पाठपुरावा करूनही अधिकारी आणि कर्मचारी दखल घेत नसल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण आहे. ''त्वरित नवीन व कार्यक्षम डीपी बसवून वीजपुरवठा सुरळीत करण्यात यावा, अन्यथा ग्रामस्थांना तीव्र आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल,'' असा इशारा गावकऱ्यांनी दिला आहे. आता महावितरण प्रशासन या गंभीर समस्येकडे तातडीने लक्ष देऊन रायगव्हाण गावाचा वीजपुरवठा पूर्ववत करणार का, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

## सिस्पे घोटाळ्यातील मुख्य आरोपी राहुल काळोखे याला इंटरपोलमार्फत फिजीमध्ये अटक

### खासदार नीलेश लंके यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला मोठे यश हजारो पीडितांच्या न्यायाच्या लढ्याला नवे बळ

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** सिस्पे घोटाळ्यातील हजारो पीडितांना न्याय मिळावा, फरार आरोपींना अटक व्हावी आणि या प्रकरणाचा तपास वेगाने पुढे जावा, यासाठी खासदार नीलेश लंके यांनी गेल्या अनेक महिन्यांपासून केंद्र व राज्यातील विविध तपास यंत्रणांकडे सातत्याने पाठपुरावा केला. या पाठपुराव्याला अखेर मोठे यश मिळाले असून, सिस्पे घोटाळ्यातील फरार मुख्य आरोपींपैकी एक आणि कथित मास्टरमाइंड अकाउंटंट राहुल शामराव काळोखे याला इंटरपोलच्या माध्यमातून फिजी येथे अटक करण्यात आली आहे.



या महत्त्वपूर्ण कारवाईमुळे अनेक वर्षांपासून न्यायाच्या प्रतीक्षेत असलेल्या हजारो पीडितांच्या आशा पुन्हा पल्लवित झाल्या आहेत. या अटकेमुळे घोटाळ्याच्या तपासाला अधिक गती मिळण्याची तसेच या प्रकरणातील इतर आरोपींनाही कायद्याच्या कचाट्यात आणण्याचा मार्ग मोकळा होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

या कारवाईसाठी महाराष्ट्र पोलीस, पोलीस अधीक्षक कार्यालय, अहिल्यानगर, सीबीआय (दिल्ली), भारत सरकारचे गृह मंत्रालय, परराष्ट्र मंत्रालय तसेच इंटरपोल यांनी परस्पर समन्वयाने काम केले. विविध यंत्रणांमध्ये सातत्याने समन्वय घडवून आणण्यासाठी खासदार नीलेश लंके यांनी संबंधित अधिकाऱ्यांशी वेळोवेळी संपर्क साधत या प्रकरणाचा पाठपुरावा केला होता.

सिस्पे घोटाळ्यातील पीडितांनी अनेकदा खासदार लंके यांची भेट घेऊन न्याय मिळवून देण्याची मागणी केली होती. त्यानंतर त्यांनी संबंधित केंद्रीय आणि राज्यस्तरीय यंत्रणांकडे या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेण्याची मागणी केली. त्याचा परिणाम म्हणून तपासाला गती मिळाली आणि आरोपीचा आंतरराष्ट्रीय स्तरावर शोध घेण्याची प्रक्रिया यशस्वी ठरली.

राहुल शामराव काळोखे याच्या अटकेनंतर त्याला भारतात आणण्यासाठी आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केली जाणार असून, त्यानंतर घोटाळ्यातील आर्थिक व्यवहार, निधीचा प्रवाह, संबंधित व्यक्तींची भूमिका आणि इतर आरोपींबाबत अधिक सखोल चौकशी होण्याची शक्यता आहे. या कारवाईनंतर सिस्पे घोटाळ्यातील पीडितांनी समाधान व्यक्त करत खासदार नीलेश लंके यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचे स्वागत केले आहे.

न्यायासाठी सुरू असलेल्या या लढ्यातील हा एक महत्त्वाचा टप्पा असून, घोटाळ्यातील प्रत्येक दोषी व्यक्तीवर कठोर कारवाई होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला आहे. खासदार नीलेश लंके यांनीही संबंधित सर्व तपास यंत्रणांचे आभार मानत, ''सिस्पे घोटाळ्यातील प्रत्येक पीडिताला न्याय मिळेपर्यंत आणि या प्रकरणातील सर्व दोषींवर कठोर कारवाई होईपर्यंत माझा पाठपुरावा सुरूच राहील,'' अशी भूमिका व्यक्त केली आहे.

### खासदार निलेश लंके यांच्या पाठपुराव्याला यश



सीबीआय, परराष्ट्र मंत्रालय एमईए, केंद्रीय गृह मंत्रालय एमईए आणि महाराष्ट्र पोलीस यांच्या समन्वयातून रेड नोटीसवरील आरोपी राहुल शामराव काळोखे याला फिजीहून भारतात यशस्वीरीत्या प्रत्यर्पित करण्यात आले असून, ३० जुलै २०२६ रोजी त्याला भारतात आणण्यात आले.

राहुल शामराव काळोखे हा मोठ्या प्रमाणावरील गुंतवणूक फसवणूक प्रकरणात वाँटेड होता. त्याने आपल्या सहकाऱ्यांसोबत संगनमत करून गुंतवणूकदारांना अत्यंत जास्त आणि हमखास परताव्याचे खोटे आश्वासन देत विविध योजनांमध्ये पैसे गुंतवण्यास प्रवृत्त केले.

या आमिषाला बळी पडून अनेक गुंतवणूकदारांनी विविध गुंतवणूक योजनांमध्ये मोठ्या प्रमाणावर पैसे जमा केले. त्यानंतर आरोपीने गुंतवणूकदारांची रक्कम अपहार करून स्वतःच्या फायद्यासाठी वापरली.गुन्हा केल्यानंतर तपास आणि न्यायालयीन कारवाई टाळण्यासाठी आरोपी देशाबाहेर फरार झाला होता. महाराष्ट्र पोलिसांच्या विनंतीवरून सीबीआयने इंटरपोलमार्फत आरोपीविरुद्ध रेड नोटीस जारी करून घेतली.

त्यानंतर आरोपीचा फिजीमध्ये ठावठिकाणा लागला आणि तेथील अधिकाऱ्यांनी त्याला अटक केली. आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर आरोपीला भारतात प्रत्यर्पित करण्यात आले. आरोपीला भारतात आणण्यासाठी भारतीय अधिकाऱ्यांचे एक विशेष पथक फिजीला गेले होते. हे पथक आरोपीसह ३० जुलै २०२६ रोजी भारतात परतले, अशी माहिती सीबीआयने दिली.

## सरपंच शरद पवार यांना उच्च न्यायालयाच्या संभाजीनगर खंडपीठाकडून जामीन मंजूर

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



> जामीन मंजूर झाल्यानंतर सरपंच शरद पवार यांनी प्रतिक्रिया देताना म्हटले की, हा गुन्हा राजकीय हेतूने आणि बदनामी करण्याच्या उद्देशाने दाखल करण्यात आला आहे. न्यायव्यवस्थेवर आमचा पूर्ण विश्वास होता आणि आज तो सार्थ ठरला. सत्याचा विजय झाला आहे.

**अहिल्यानगर–** नगर तालुक्यातील चिचोंडी पाटील गावचे सरपंच तथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षाचे नगर तालुकाध्यक्ष तथा खासदार निलेश लंके यांचे कट्टर समर्थक शरद खंडेराव पवार यांना कथित अपहरण, मारहाण व खंडणी प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयाच्या संभाजीनगर खंडपीठाने जामीन मंजूर केला आहे. या प्रकरणातील यापूर्वी दोन आरोपींना अटकपूर्व जामीन, तर एका आरोपीला सत्र न्यायालयातून नियमित जामीन मिळाला होता.

या प्रकरणात शरद पवार यांच्यासह चार जणांविरुद्ध नगर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. फिर्यादी किशोर महादेव परभने (रा. बांधखेल, ता. आष्टी, जि. बीड) यांनी खासदार निलेश लंके यांच्याविषयी गंभीर स्वरूपाची सोशल मीडियावर आक्षेपार्ह पोस्ट केल्याच्या कारणावरून पुणे येथून आपले अपहरण करण्यात आले, मारहाण करण्यात आली आणि खंडणीची मागणी करण्यात आल्याचा आरोप फिर्यादीत केला होता.

या गुन्ह्यानंतर शरद पवार हे सुमारे अडीच महिन्यांपासून न्यायालयीन कोठडीत होते. यापूर्वी १२ जून रोजी अहिल्यानगर जिल्हा व सत्र न्यायालयाने त्यांचा जामीन अर्ज फेटाळला होता. त्यानंतर १७ जून रोजी त्यांनी संभाजीनगर खंडपीठात जामीनासाठी अर्ज दाखल केला. न्यायमूर्ती वाघवसे यांच्या न्यायासनासमोर या अर्जावर ७ सुनावण्या झाल्यानंतर दोन्ही बाजूंचा प्रखर युक्तिवाद ऐकून न्यायालयाने जामीन मंजूर केला. सुनावणीदरम्यान बचाव पक्षाचे वकील ॲड. नागरगोजे आणि ॲड. सत्यजित पवार यांनी फिर्यादीने कथित घटना घडल्यानंतर तब्बल तीन महिन्यांनी गुन्हा दाखल केल्याने न्यायालयाचे लक्ष वेधले. तसेच कथित अपहरण, मारहाण व खंडणीच्या ■ पान ४ वर

## नगर शहर परिसरातून दुचाकी लांबवणारा सराईत चोरटा जेरबंद

### एमआयडीसी पोलिसांच्या कारवाईत ९ मोटारसायकल जप्त

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–**नगर शहर व परिसरातून मोटारसायकल चोरी करणाऱ्या सराईत चोरट्याला जेरबंद करण्यात एमआयडीसी पोलिसांना यश आले आहे. रामदास बाबासाहेब ससाणे (वय ३२, रा. कात्रड, राहुरी) असे अटक आरोपीचे नाव असून त्याच्याकडून विविध कंपन्यांच्या एकूण ९ दुचाकी हस्तगत करण्यात आल्या आहेत.

डोंगरगण येथील रामेश्वर मंदिर परिसरातून आबासाहेब आढाव यांची डिस्कव्हर मोटारसायकल अज्ञात चोरट्याने लांबवली होती. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. एमआयडीसी पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सपोनि हेमंत थोरात यांनी तपासाची चक्रे फिरवत सीसीटीव्ही फुटेज आणि तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे पोलीस पथकाने रामदास बाबासाहेब ससाणे याला राहत्या घरातून ताब्यात घेतले. पोलिसी खाक्या दाखवताच त्याने गुन्हा कबूल केला. त्याच्याकडून नगर शहर व ■ पान ४ वर

## खोटी ॲट्रॉसिटी दाखल करून अडकविण्याचा प्रयत्न; निष्पक्ष चौकशीची शाकीर शेख यांची मागणी

### सीसीटीव्ही फुटेज, सीडीआर–एसडीआर आणि मोबाईल लोकेशन तातडीने तपासण्याची पोलीस अधीक्षकांकडे मागणी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** खोटी घटना तयार करून आपल्याविरुद्ध ॲट्रॉसिटीचा गंभीर गुन्हा दाखल करण्यात आला असून, या प्रकरणाची निष्पक्ष व वैज्ञानिक पद्धतीने चौकशी करण्यात यावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते शेख शाकीर अब्दुल सत्तार यांनी जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्र. ४७२/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता आणि अनुसूचित जाती–जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियमाच्या तरतुदींनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादीत २९ जुलै रोजी रात्री सुमारे ९ वाजता पंचवीर चौक परिसरात जातिवाचक शिवीगाळ आणि धमकी दिल्याचा आरोप करण्यात आला आहे. मात्र, कथित घटनेच्या वेळी आपण घटनास्थळी उपस्थित नव्हतो तसेच फिर्यादीसोबत कोणतीही भेट, चर्चा अथवा वाद झाला नसल्याचा दावा शेख यांनी केला आहे. नाशिक येथे झालेल्या उपोषणाचा संदर्भ देऊन यापूर्वी आपल्याविरुद्ध तक्रार दाखल करण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. त्या आरोपांना वस्तुनिष्ठ पुराव्यांचा आधार मिळणार नसल्याचे लक्षात आल्यानंतर वेगळी व्यक्ती पुढे करून जातिवाचक शिवीगाळ केल्याची खोटी घटना तयार करण्यात आल्याचा संशय शेख यांनी व्यक्त केला आहे.

या प्रकरणातील सत्यता समोर येण्यासाठी सुमनराज पंचवीर चौक, चावडी चौक, कोतवाली पोलीस ठाणे परिसर तसेच संबंधित मार्गावरील महानगरपालिका, पोलीस विभाग, दुकाने, हॉटेल आणि खासगी आस्थापनांमधील सीसीटीव्ही फुटेज तातडीने ताब्यात घेऊन सुरक्षित करावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

फिर्यादीने भोजन केल्याचा उल्लेख असलेल्या हॉटेलमधील सीसीटीव्ही फुटेज, भोजनाचे बिल, अथवा युपीआय कार्ड पेमेंटची नोंद तसेच हॉटेल कर्मचारी आणि व्यवस्थापकांचे जबाब तपासण्यात यावेत. त्याचप्रमाणे शेख आणि फिर्यादी या दोघांचे सीडीआर आणि एसडीआर मोबाईल टॉवर लोकेशन आणि उपलब्ध डिजिटल संपर्क तपासल्यास कथित घटनेच्या वेळी दोघे नेमके कुठे होते, हे स्पष्ट होईल, असे निवेदनात म्हटले आहे. फिर्याद दाखल होण्यापूर्वी कोतवाली पोलीस ठाण्यात कोणकोणत्या व्यक्ती आल्या होत्या, त्यांनी कोणत्या अधिकारी किंवा कर्मचाऱ्यांची भेट घेतली, फिर्यादीचा जबाब अथवा मजकूर ■ पान ४ वर

## छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्याचे आपला मावळाचे कार्य प्रेरणादायी – किरण काळे

### संघटनेच्या शहराध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल राम झिने यांचा ठाकरे शिवसेनेच्या वतीने सत्कार

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार आजच्या तरुण पिढीसाठी दिशादर्शक आहेत. गडकिल्ले संवर्धन मोहिमेच्या माध्यमातून हा विचार शालेय विद्यार्थी तरुणांपर्यंत पोहोचवण्याचे काम कौतुकास्पद आहे. महाराजांचे विचार नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्याचे यासाठी काम करणाऱ्या आपला मावळा संघटनेचे कार्य प्रेरणादायी आहे, असे प्रतिपादन शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) महानगर प्रमुख किरण काळे यांनी केले आहे. आपला मावळा संघटनेच्या शहराध्यक्षपदी राम झिने यांची निवड झाल्याबद्दल शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने त्यांचा काळे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी ते बोलत होते.

यावेळी जिल्हाप्रमुख राजेंद्र दळवी, उपजिल्हाप्रमुख रावजी नांगरे, उपजिल्हाप्रमुख दीपक भोसले, उपशहर प्रमुख मनोज गुंदेचा, उपशहर प्रमुख सुनील भोसले, अल्पसंख्यांक आघाडीचे अनिस चुडीवाला, कामगार आघाडीचे जिल्हाप्रमुख विलास उबाळे, केडगाव शिवसेनेचे प्रतीक बारसे, ■ पान ४ वर

## दै. आकर्षण निवडक

### १०० वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनानिमित्त आयोजित

**अहिल्यानगर-** महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे व समर्थ युवा फाउंडेशन पुणे महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने १०० वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन पुणे येथे संपन्न होणार आहे. या संमेलनाच्या निमित्ताने संमेलनाचे बोधचिन्ह बनवा स्पर्धा संपूर्ण देशभरात आयोजित केली जात आहे. या स्पर्धेमध्ये सर्व नागरिक, कलाकार, चित्रकार ,विद्यार्थी ,व्यावसायिक डिझायनर, आदी सर्वजण या स्पर्धेत सहभागी होऊ शकतात. ही स्पर्धा सर्वांसाठी खुली आहे. तरी सर्वांनी या स्पर्धेत सहभागी व्हावे अशी माहिती मसापचे अध्यक्ष योगेश सोमण, प्रमुख कार्यवाह स्वाती महाळंक, कोषाध्यक्ष प्रदीप निफाडकर यांनी दिली. शंभराव्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनानिमित्त आयोजित केलेल्या या बोधचिन्ह स्पर्धेमध्ये संमेलनाचे बोधचिन्ह तयार करताना, त्या बोधचिन्ह मध्ये पुढील बाबी असाव्यात - पुणे शहराचा ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसा, मराठी साहित्याची समृद्ध परंपरा आणि अभिजात मराठी भाषेची वैश्विक ओळख, महाराष्ट्राची सांस्कृतिक ओळख, आधुनिकता व भविष्याचा वेध, तसेच संमेलनाचे शंभरावे वर्ष,( शताब्दी) ठळकपणे प्रतिबिंबित झालेले असावे. बोधचिन्ह हे रंगीत असावे. त्याचा आकार मध्यम स्वरूपाचा असावा. विशेष म्हणजे तयार करण्यात येणारे बोधचिन्ह हे पूर्णपणे मूळ स्व. कलाकृती असली पाहिजे ते कोणत्याही विद्यमान डिझाईनची प्रत किंवा कॉपीराईटचे उल्लंघन करणारे नसावे याची सर्वांनी नोंद घ्यावी. तसेच ते पीडीएफ व जेपीजी स्वरूपातही बनवावे. बोधचिन्ह तयार करून त्या बोधचिन्हां मध्ये आपण काय प्रतिबिंबित केले आहे. त्याविषयी मराठी भाषेत १०० ते १५० शब्दात स्वतंत्र माहिती जोडणे अनिवार्य आहे. परीक्षकांचा व आयोजन समितीचा निर्णय अंतिम असून, तो सर्व स्पर्धकांना बंधनकारक राहील. बोधचिन्हाच्या कागदाच्या मागील बाजूला स्पर्धकाने आपले संपूर्ण नाव, संपूर्ण पत्ता संपर्क क्रमांक, ई-मेल आयडी, व संकल्पना स्पष्टीकरण जोडणे महत्त्वाचे आहे. बोधचिन्ह तयार करून ते २० ऑगस्ट २०२६ पर्यंत उदय मेडिकल , एम.जी रोड, कापड बाजार, अहिल्यानगर येथे समक्ष जमा करावे. विजेत्या स्पर्धकाला ५१ हजार रुपयांचे रोख पारितोषिक व सन्मानचिन्ह देऊन यथोचित गौरविण्यात येणार आहे. तसेच स्पर्धेत सहभागी सर्वांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात येईल. तरी सर्वांनी या स्पर्धेत सहभागी व्हावे असे आवाहन महाराष्ट्र साहित्य परिषदेचे विभागीय कार्यवाह व जिल्हा प्रमुख श्री. जयंत येलुलकर ,व अ.नगर जिल्हा प्रमुख प्रा. गणेश भगत यांनी केले अधिक माहितीसाठी मोबा.९६०७३९५१७३ व मोबा. ९४९४०९८८६ या क्रमांकावर संपर्क साधावा.

---

ढाकणे शैक्षणिक संकुलात राष्ट्रसंत भगवान बाबा जयंती व गुरुपौर्णिमानिमित्त

# सिव्हिल अभियांत्रिकी क्षेत्रातील संधी विषयावर व्याख्यान



(छाया : बाबा पालवे)

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**राक्षी–** ढाकणे शैक्षणिक संकुल, राक्षी येथील श्री स्वामी समर्थ मंदिरामध्ये राष्ट्रसंत भगवान बाबा जयंती व गुरुपौर्णिमेनिमित्त पालखी मिरवणूक, पूजन व व्याख्यान कार्यक्रम भक्तिमय व उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ढाकणे शैक्षणिक संकुलाचे संस्थापक अध्यक्ष समाजभूषण डॉ. एकनाथराव ढाकणे हे होते. प्रमुख व्याख्याते म्हणून महाराष्ट्र शासनाच्या तंत्रशिक्षण विभागातून निवृत्त झालेले श्री. आदिनाथ मारुतीराव लवांडे (एम.ई. सिव्हिल स्ट्रक्चर्स), माजी निवड श्रेणी प्राध्यापक यांनी ''सिव्हिल अभियांत्रिकी क्षेत्रातील संधी'' या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले.

आपल्या व्याख्यानात श्री. आदिनाथ लवांडे यांनी सिव्हिल अभियांत्रिकी क्षेत्रातील बदलते तंत्रज्ञान, रोजगाराच्या विविध संधी, शासकीय व खासगी क्षेत्रातील करिअर, उच्च शिक्षणाच्या संधी तसेच विद्यार्थ्यांनी आत्मसात करावयाची तांत्रिक कौशल्ये याविषयी मार्गदर्शन केले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी गुणवत्तापूर्ण शिक्षणासोबत आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करून स्पर्धात्मक युगात स्वतःचे स्थान निर्माण करावे, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमास मा. बबनराव बडे व डॉ. खेडकर ,सेवानिवृत्त ग्रामविकास अधिकारी विष्णू आंधळे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. सुनील औताडे यांनी केले.

यावेळी प्रा. किशोर बटुळे यांनी राष्ट्रसंत भगवान बाबा यांच्या जीवनप्रवासाचा प्रेरणादायी आढावा घेत त्यांच्या समाजप्रबोधन, अध्यात्म व मानवसेवेतील कार्याचे महत्त्व विशद केले. त्यानंतर श्री स्वामी समर्थ महाराजांची महापूजा, आरती व गुरुपौर्णिमा पालखी मिरवणूक भक्तिमय वातावरणात संपन्न झाली. या कार्यक्रमास प्रा. आर. एच. अत्तार, प्रा. महेश मरकड, प्रा. प्रवीण नागरगोजे, प्रा. संतोष आंधळे तसेच संस्थेचे प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी आणि भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता उपस्थित मान्यवरांचे आभार मानून उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आली.

---

# नाथसागरची झेप सत्तरीकडे; ६९.३५ टक्के पाणीसाठा

## शेती, उद्योग आणि पिण्याच्या पाण्याला मोठा दिलासा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**पैठण–** जायकवाडी अर्थात नाथसागर धरणातील पाणीसाठ्यात सातत्याने वाढ होत असून गुरुवारी धरणातील जिवंत पाणीसाठा ६९.३५ टक्क्यांवर पोहोचला आहे. धरणात सध्या ५१.६० टीएमसी पाणी उपलब्ध असून मराठवाड्यासाठी ही अत्यंत दिलासादायक बाब मानली जात आहे.

नाशिक जिल्ह्यातील धरणांतून सुरू असलेल्या विसर्गामुळे जायकवाडीत मोठ्या प्रमाणात पाण्याची आवक झाली. त्यामुळे आगामी काळात खरीप व रब्बी हंगामातील सिंचनाची उपलब्धता वाढणार असून शेतकऱ्यांना मोठा आधार मिळणार आहे. तसेच छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, परभणी आदी जिल्ह्यांतील पिण्याच्या पाण्याची चिंता देखील मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे. दरम्यान, वाढलेल्या पाणीसाठ्यामुळे पैठण, वाळूज, शेंद्रा-बिडकीनसह औद्योगिक क्षेत्रांनाही आवश्यक पाणी उपलब्ध होणार असल्याने उद्योग क्षेत्रालाही याचा सकारात्मक फायदा होणार आहे.

---

# 'चिंब भिजलेले' हिंदी– मराठी गीतांच्या मैफलीचे शनिवारी आयोजन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**




**अहिल्यानगर–** श्रीपूजा इव्हेंट्स प्रस्तुत ''चिंब भिजलेले'' हा बहुप्रतीक्षित संगीतमय कार्यक्रम शनिवार दि. १ ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी ६.०० वाजता सावेडी येथील माऊली सभागृह येथे रंगणार आहे. पावसाळ्याच्या रम्य वातावरणात हिंदी व मराठीतील सदाबहार गीतांचा नजराणा रसिकांसमोर सादर केला जाणार असून, टॉप टेन म्युझिशियनसह लाईव्ह ऑर्केस्ट्रा हे या कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण ठरणार आहे.

कार्यक्रमाची संकल्पना व दिग्दर्शन श्रीकांत गडकरी यांचे असून, पूजा गडकरी या आयोजक म्हणून कार्यरत आहेत. या संगीतमय मैफलीत हेमंत नरसाळे, प्रदीप कुलकर्णी, ईस्टर पवार, रविंद्र बक्षी, अभिजित गायकवाड, डॉ. राहुल पंडित, किशोर जाधव, चंदर ललवाणी, अजय दगडे, डॉ. साईप्रसाद शिंदे, उमेश कोठाडिया, समीर खान, राजू क्षेत्रे आणि पवन फिरोदिया हे गायक-कलाकार आपल्या सुरेल सादरीकरणाने रसिकांना मंत्रमुग्ध करणार आहेत. कार्यक्रमाला साथसंगत देणाऱ्या अनुभवी वादकांमध्ये एडविन परांजपे (कीबोर्ड), संकेत देहाडे (लीड गिटार), प्रकाश लगड (बेस गिटार), नरेंद्र साळवे (कीबोर्ड), श्रीकांत गडकरी (ऑक्टोपॅड/रिदम मशीन), अमोल कनगरे (सॅक्सोफोन), अमित साळवे (ढोलक/तुंबा), बबन साळवे (काँगो), यश वाडेकर (फ्लूट), सिद्धार्थ थते (तबला/काँगो) आणि विकी साळवे (आर्टीस्ट) यांचा समावेश आहे. त्यांच्या दर्जेदार साथसंगतीमुळे कार्यक्रमाची रंगत अधिक खुलणार आहे.

या कार्यक्रमासाठी काशीद हॉस्पिटल, मिडास सुझुकी, हॉटेल यश पॅलेस, हॉटेल यश ग्रँड, अनंता व्हेज रेस्टॉरंट, वर्ध ग्रीन्स रिसॉर्ट, आमी आणि वासन टोयोटा यांनी प्रायोजक म्हणून सहकार्य केले आहे. तसेच ध्वनी व प्रकाशयोजनेची जबाबदारी हरमन प्रो ऑडिओ अँड लाईट्स ब्रीजेश बजाज यांनी स्वीकारली आहे. पावसाच्या सरींसह सुरेल गीतांचा आनंद घेण्यासाठी आणि अविस्मरणीय संगीत मैफलीचा अनुभव घेण्यासाठी संगीतप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन श्रीकांत गडकरी यांनी केले आहे.

---

# स्पर्धात्मक युगात ज्ञान, तंत्रज्ञान आणि योग्य गुंतवणुकीचा अवलंब आवश्यक – अविनाश कुलकर्णी

## एसा नॉलेज सिरीजमध्ये 'रेंटल यिल्ड, सोलॅटियम आणि व्यवसाय वृद्धी' विषयावर मार्गदर्शन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** आर्किटेक्ट, इंजिनिअर्स अँड सर्व्हेअर्स असोसिएशन (एसा) अहिल्यानगर आणि पोलाद स्टील, जालना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'एसा नॉलेज सिरीज' अंतर्गत संस्थेचे ज्येष्ठ सभासद अविनाश कुलकर्णी यांचे 'रेंटल यिल्डचे गुंतवणुकीतील महत्त्व, सोलॅटियमचे जमीन गुंतवणुकीतील महत्त्व आणि बांधकाम व्यवसाय अधिक सक्षम करण्यासाठी पूरक बाबी' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. कार्यक्रमाचे सहप्रायोजक पोलाद स्टील होते.

यावेळी मार्गदर्शन करताना अविनाश कुलकर्णी यांनी आजच्या स्पर्धात्मक युगात कोणत्याही क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी केवळ अनुभव पुरेसा नसून, सखोल ज्ञान, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि बदलत्या



परिस्थितीनुसार स्वतःला विकसित करण्याची तयारी आवश्यक असल्याचे सांगितले. व्यवसाय अधिक सक्षम, फायदेशीर आणि शाश्वत करण्यासाठी योग्य गुंतवणूक, कायदेशीर माहिती आणि आधुनिक कार्यपद्धतींचा अवलंब करणे काळाची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

व्याख्यानामध्ये त्यांनी तीन महत्त्वाच्या विषयांवर सविस्तर मार्गदर्शन केले. रेंटल यिल्ड आणि ॲप्रिसिएशन यिल्ड या विषयावर बोलताना त्यांनी मालमत्तेमध्ये गुंतवणूक करताना केवळ मालमत्तेच्या किमतीत होणारी वाढ (ॲप्रिसिएशन) न पाहता, त्यातून मिळणारे नियमित भाडे उत्पन्न (रेंटल यिल्ड) देखील तितकेच महत्त्वाचे असल्याचे सांगितले. गुंतवणूकदारांनी आर्थिक परताव्याचा सर्वांगीण विचार करून निर्णय घ्यावा, अशी सूचना त्यांनी केली.

सोलॅटियम इन लँड ॲक्विझिशन या विषयावर त्यांनी जमीन संपादन प्रक्रियेदरम्यान मिळणाऱ्या भरपाईतील सोलॅटियम म्हणजे काय, त्याचे स्वरूप, त्याचा लाभ कसा मिळतो आणि जमीनधारकांचे कायदेशीर हक्क कोणते आहेत, याविषयी सविस्तर माहिती दिली.

तसेच बांधकाम व्यवसाय अधिक सक्षम करण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाचा स्वीकार, नवीन व्यक्तींशी व्यावसायिक संपर्क वाढविणे, बदलत्या बाजारपेठेनुसार कार्यपद्धतीत सुधारणा करणे आणि सातत्याने कौशल्यविकास करणे आवश्यक असल्याचे सांगत विविध उपयुक्त टिप्स त्यांनी उपस्थितांना दिल्या.

---

# 'देहबुद्धीच्या विस्मरणासाठी नाम आवश्यक; नामातच परमेश्वरप्राप्तीचा सहज मार्ग'- ह.भ.प. गंगाधर महाराज झाडे

## नामस्मरणातूनच आत्मस्वरूपाची ओळख; गोंदवलेकर महाराज मंदिरातील अखंड हरिनाम सप्ताहाची भक्तिमय सांगता

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** शीलाविहार येथील श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज मंदिरात गुरुपौर्णिमेनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता काल्याचे कीर्तन, काला फोडणे आणि महाप्रसादाच्या भक्तिमय कार्यक्रमाने अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात झाली. या प्रसंगी ह.भ.प. गंगाधर महाराज झाडे यांचे प्रभावी कीर्तन आणि आध्यात्मिक निरूपण हे सप्ताहाचे प्रमुख आकर्षण ठरले. मंदिर परिसरात अखंड हरिनामाचा गजर, टाळ-मृदंगाचा निनाद आणि भाविकांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे संपूर्ण परिसर भक्तिरसाने भारावून गेला होता. कीर्तनात मार्गदर्शन करताना ह.भ.प. गंगाधर महाराज झाडे म्हणाले की, ''परमेश्वराचा अंश प्रत्येक प्राणीमात्रामध्ये आहे. मात्र त्या परमसत्याची जाणीव करून घेण्याची बुद्धी केवळ मनुष्याला लाभली आहे. जीव हा मुळात परमेश्वरस्वरूपच असल्यामुळे स्वतःची खरी ओळख करून घेण्यासाठी नामस्मरणाशिवाय दुसरा कोणताही सहज आणि शाश्वत मार्ग नाही. देह, अहंकार, मोह आणि मायेच्या पाशात अडकलेल्या मनाला मुक्त करण्याचे सामर्थ्य केवळ भगवंताच्या नामात आहे. देहबुद्धीचा विसर पडून आत्मबुद्धी जागृत व्हावी, यासाठी अखंड नामस्मरण आवश्यक आहे. ज्या क्षणी मनुष्याच्या मुखी आणि अंतःकरणात भगवंताचे नाम अखंड वास करू लागते, त्या क्षणापासून त्याच्या जीवनातील दुःख, चिंता आणि अस्थिरता दूर होऊ लागते.''

ते पुढे म्हणाले, ''गुरु हा केवळ व्यक्ती नसून तो ज्ञानाचा अखंड प्रवाह आहे. गुरुपौर्णिमा म्हणजे गुरुचरणी कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस आहे. गुरुकृपेशिवाय नामाची गोडी लागत नाही आणि नामाशिवाय आत्मसाक्षात्कार होत नाही. आजच्या धकाधकीच्या जीवनात माणूस बाह्य सुखांच्या मागे धावत आहे; मात्र अंतःकरणातील शांती त्याला सापडत नाही. ही शांती मिळवायची असेल तर संतांनी दाखविलेल्या नामभक्तीच्या मार्गाचा स्वीकार करणे गरजेचे आहे. संतांच्या विचारांचे आचरण, सत्संग, हरिपाठ, कीर्तन आणि भागवत श्रवण यामुळे जीवनाला योग्य दिशा मिळते. प्रत्येक घरातून नामाचा नाद घुमू लागला, तर समाजातील वैर, मत्सर आणि अस्वस्थता आपोआप दूर होईल.''

या अखंड हरिनाम सप्ताहात श्रीमद् भागवत कथेचे निरूपण ह.भ.प. धनंजय महाराज क्षीरसागर यांनी केले. त्यांनी भागवत धर्माचे महत्त्व, भक्तीमार्गाची परंपरा आणि संत साहित्याचा जीवनावर होणारा परिणाम यांचे रसाळ विवेचन करून उपस्थित भाविकांना भक्तिरसात तल्लीन केले. त्यांच्या कथेमुळे सप्ताहभर मंदिरात आध्यात्मिक वातावरण निर्माण झाले होते.

यावेळी श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज यांच्या ग्रंथांचे पारायण आणि वाचन सोहळाही मोठ्या भक्तिभावाने पार पडला. व्यासपीठ संचालन सौ. मनीषा भोंग यांनी केले. सप्ताहादरम्यान अखंड नामजापासाठी ब्रह्मचैतन्य सेवाभावी मंडळाचे सदस्य नियोजनबद्ध पद्धतीने सेवेत सहभागी झाले. त्यांच्या अथक सेवेमुळे सप्ताह यशस्वीपणे पार पडल्याची भावना उपस्थित भाविकांनी व्यक्त केली.

सप्ताहाची सांगता काल्याच्या कीर्तनाने आणि पारंपरिक पद्धतीने काला फोडून करण्यात आली. त्यानंतर उपस्थित हजारो भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. संपूर्ण कार्यक्रमात शिस्त, भक्तिभाव आणि उत्साहाचे वातावरण अनुभवायला मिळाले. सप्ताहाच्या यशस्वी आयोजना साठी ब्रह्मचैतन्य सेवाभावी मंडळाच्या सर्व पदाधिकारी, सदस्य आणि सेवकांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या शेवटी सप्ताहाच्या यशस्वीतेसाठी सहकार्य करणाऱ्या सर्वांचे आभार श्री.सुंदरदास रिंगणे यांनी मानले.

---

### शब्दकोडे क्रमांक : १७



**आडवे शब्द :** १. आपला देश ३. पुरचुंडी ४. डोंगर फोडून तयार केलेला खड्डा ७. ज्याचे लाड करतात तो ८. पठाराचा पृष्ठभाग असतो ९. याक्षणी १०. कपडे वाळवण्यास वापरतात ती लाकडी ११. पाताळ १३. समीप १४. वायू १५. गाईच्या दुधापासून बनवतात १६. लीन १७. एक पांढरा पक्षी १८. व्याघ्र १९. युद्ध २०. पुन्हा २२. विशेष २३. देह २४. अंतर २५. मला २७. उजवा-विरुद्ध २९. वतन राखणारा ३१. द्वारपाल ३२. खाष्ट ३४. कर्ण ३६. कथेचा मुख्य गाभा ३९. पतीची दुसरी पत्नी ४१. श्रीकृष्णाची सखी ४२. नादमय स्वर ४३. वस्तुमान ४५. आवराआवर ४८. ताजा ४९. अर्ज

**उभे शब्द :** १. एक भारतीय व्यंजन डाळ ** २. तहसीलदार ३. साद ४. उत्तर भारतातील एक शहर ५. समूह ६. भूतांचा राजा ८. अविरत ९. एक तुरट चवीचे फळ १०. तुरंगवास १२. मोदकात भरतात ती पूड १३. तगज - उलट लिहा १७. वृद्धी १९. मिश्रण २०. दैना २१. घड्याळाचा ठोका २२. घराणे २५. दुपार २६. बल देण्याची क्रिया २८. एक कडधान्य ३०. होकार-विरुद्ध ३३. राशींची एकूण संख्या ३५. सूट ३६. सरळ स्वभावाचा ३७. पायपोस ३८. आजार ४०. जम ४१. द्वेष ४३. बाहेर-विरुद्ध ४४. मग्न ४६. ताकद ४७. नूतन

**शब्दकोडे क्रमांक : १६ चे उत्तर**

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| बे | ख | ब | र | | क | पा | ळ | | क | सा | रा |
| ता | ल | | शी | त | | व | | खो | ड | | ठ |
| ल | ब | क | | क | मं | ड | लू | | व | ही | |
| | त | | ना | रा | | र | ट | र | ट | | सा |
| नो | | कि | | र | मा | | मा | ती | | धा | व |
| | पा | र | वा | | ह | ज | र | | अ | | का |
| सा | | को | र | डा | | व | | म | ज | बू | र |
| ज | व | ळ | | ब | रा | | त | | ग | ट | |
| | द | | खा | र | | पा | ल | घ | र | | का |
| जा | न | व | र | | टा | क | | ट | | ते | ल |
| डा | | म | ट | की | | क | स | | थो | | व |
| | ध | न | | ट | क | ला | | स | र | प | ण |

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### क्रूरतेचे आरोप सिद्ध न झाल्याने पतीचा घटस्फोटाचा दावा खर्चासहित फेटाळला



अहिल्यानगर - अहमदनगर येथील दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर), अहमदनगर यांनी हिंदू विवाह याचिकेमध्ये दिनांक २८ जुलै २०२६ रोजी महत्त्वपूर्ण निर्णय देत भारतीय सैन्य दलातील पतीने पत्नीविरुद्ध दाखल केलेली घटस्फोटाची याचिका खर्चासह फेटाळून लावली. सदर प्रकरणात अर्जदार पतीने हिंदू विवाह कायदा १९५५ मधील कलम १३(१)(-) अंतर्गत पत्नीने विविध प्रकारे क्रूरता केल्याचा आरोप करत विवाह विच्छेदाची मागणी केली होती. तथापि, मा. न्यायालयाने दोन्ही पक्षांचे साक्षी-पुरावे तसेच उपलब्ध कागदपत्रांचे सखोल परीक्षण करून अर्जदाराने केलेले क्रूरतेचे आरोप विश्वासार्ह, ठोस व कायदेशीरदृष्ट्या ग्राह्य पुराव्यांच्या आधारे सिद्ध करण्यात अपयशी ठरल्याचे नमूद केले. केवळ आरोपांच्या आधारे विवाह विच्छेद मंजूर करता येणार नाही, असा स्पष्ट निष्कर्ष नोंदवत मा. न्यायालयाने पतीची घटस्फोटाची याचिका फेटाळून लावली. तसेच, पत्नी व दोन अल्पवयीन मुलांच्या निर्वाहासाठी मा. न्यायालयाने दरमहा २५,०००/- इतकी कायमस्वरूपी पोटगी अदा करण्याचे आदेश दिले आहेत. या निर्णयातून कौटुंबिक वादांमध्ये केवळ आरोप करणे पुरेसे नसून, ते आरोप ठोस, विश्वासार्ह व कायदेशीरदृष्ट्या ग्राह्य पुराव्यांद्वारे सिद्ध करणे आवश्यक असल्याचे पुन्हा अधोरेखित झाले आहे. सदर प्रकरणात प्रतिवादी पत्नीच्या वतीने ॲड. आशिष एस. सुसरे, ॲड. अश्विनी दुधाडे-सुसरे व ॲड. अजिंक्य एस. आंधळे यांनी काम पाहिले. प्रतिवादी पत्नीच्या वतीने ॲड. आशिष एस. सुसरे यांनी अर्जदार पतीचा घेतलेला उलटतपास हा खटल्यातील महत्त्वाचा आणि निर्णायक टप्पा ठरला. तसेच, मा. सर्वोच्च न्यायालयाचे विविध न्यायनिवाडे सादर करून पत्नीची बाजू प्रभावीपणे मांडण्यात आली.

### मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाचा निर्वाळा

अहिल्यानगर - अपील प्रलंबित असताना बारा इमाम कोठला ट्रस्टला नवीन विश्वस्त नेमण्याचा अधिकार नसल्याचा निर्वाळा मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिला आहे. वक्फ बोर्डाने केलेल्या विश्वस्तांच्या नियुक्तीला न्यायालयाने रद्द ठरवली आहे. एसवाय निसार बडेसाहेब जहागिरदार आणि ओआरएस विरुद्ध महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड मुख्य कार्यकारी अधिकारी आणि अन्य यांनी अपील दाखल केले होते.बडेसाहब जहागिरदार व इतर यांच्याविरुद्ध महाराष्ट्र वक्फ बोर्डाला अहवाल दाखल करण्याचा कोणताही अधिकार नाही. त्यामुळे अर्ज फेटाळण्यात आला. सदर आदेशाला वक्फ न्यायाधिकरणासमोर आव्हान देण्यात आले आणि वक्फ न्यायाधिकरणाने अपीलकर्त्याने सादर केलेला बदल अहवाल नाकारण्याच्या मर्यादेपर्यंत वक्फ बोर्डाचा आदेश अंशतः रद्द करून रेस्पॉडंट क्र. २ने दाखल केलेला अर्ज फेटाळण्याच्या मर्यादेपर्यंत आदेश कायम ठेवला त्यामुळे अपीलकर्त्याने हे अपील दाखल केले असून, हे अपील न्यायालयासमोर न्यायप्रविष्ठ आहे. वक्फ बोर्ड यांच्या वकिलांनी युक्तीवाद दरम्यान सादर केलेल्या आदेश पारित झाल्यानंतर वक्फ बोर्डाने आदेशान्वये ५ नवीन विश्वस्तांची नियुक्ती केली. त्यामुळे हे अपील निष्फळ ठरले आहे. अपीलकर्त्याचे वकील म्हणून एस. एस. काझी, रेस्पॉडंट क्र. १च्या वतीने ॲड. एन. ए. देशमुख व रेस्पॉडंट क्र. २च्या वतीने ॲड. एस. आर. राजपूत यांनी केले पाहिले. दस्तगीर बडेसाहब जहागिरदार, शेख शकूर अजीज, नजीर जी जी खान, सय्यद जुबेर हुंडेकरी, सय्यद निसार बडेसाहब जहागिरदार हे बारा इमाम कोठला ट्रस्टचे विश्वस्त आहेत.

### ८ ऑगस्टपासून देशभर 'जंतर-मंतर क्रांती'चा एल्गार!

अहिल्यानगर - भारतीय संसदीय लोकशाहीला व्यक्तिपूजा, घराणेशाही, जातीय समीकरणे, धार्मिक ध्रुवीकरण, भ्रष्टाचार, धनशक्ती आणि जनविरोधी नोकरशाहीच्या विळख्यातून मुक्त करून संविधानाधिष्ठित, उत्तरदायी आणि जनकेंद्रित लोकशाही व्यवस्था निर्माण करण्याच्या उद्देशाने येत्या ८ ऑगस्ट २०२६ पासून देशभर 'जंतर-मंतर क्रांतीदिन' या नावाने व्यापक जनजागृती आंदोलन सुरू करण्यात येणार आहे. या आंदोलनाच्या माध्यमातून नागरिकांमध्ये लोकशाहीविषयी जागरूकता निर्माण करून शासन आणि निवडणूक व्यवस्थेत मूलभूत परिवर्तन घडवून आणण्याचा संकल्प करण्यात आला असल्याची माहिती पीपल्स हेल्पलाईन आणि भारतीय जनसंसदेचे संस्थापक ॲड. कारभारी गवळी व अशोक सब्बन यांनी दिली.या आंदोलनाचा मुख्य उद्देश भारतीय लोकशाहीला लोकभक्ती, ज्ञानभक्ती आणि कर्मभक्ती या त्रिसूत्रीवर उभे करणे हा असून, सत्तेचे केंद्र नागरिक असावेत, लोकप्रतिनिधी व नोकरशाही जनतेसमोर उत्तरदायी असावी आणि शासनाची प्रत्येक कृती संविधानाच्या चौकटीत राहून लोकहितासाठी व्हावी, अशी भूमिका आंदोलनातून मांडण्यात आली आहे.

# पद्मशाली समाजाने बागुलपंडुगु सण वृक्षारोपन करून साजरा करावा - मा. नगरसेविका सौ. वीणा बोज्जा

## नगर शहरातील बागुल पंडुगु सण ३१ जुलैला साजरा होणार

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** पद्मशाली समाजाचा बागुलू पंडुगू सण म्हणजेच बागेचा सण म्हणून गेल्या कित्येक वर्षा पासून आषाड महिन्यात येणाऱ्या पौर्णिमेनंतर साजरा केला जातो. याही वर्षी हा सण पद्मशाली समाजाने वृक्षारोपण करून साजरा करावा असे आवाहन मा. नगरसेविका सौ. वीणाताई बोज्जा यांनी एका पत्रकान्वये आवाहन केले आहे.

या महिन्यातील ३१ जुलै रोजी हा साजरा होत असून पद्मशाली समाजामधील बागुलू पंडूगू हा सण मोठ्या थाटात माटात समाजातील सर्व घटक एकत्र येऊन अहिल्यानगर शहरातील बालिकाश्रम रोड येथील मंदिरात व तोफखाना भागातील मंदिरात तसेच सावेडी उपनगरातील श्रमिक नगर येथे मोठया उत्साहाने साजरा केला जातो.



या दिवशी पदमशाली समाजातील लोक देवीला साकडे घालून प्रार्थना करून निसर्गाचे रक्षण करण्यासाठी तसेच पर्जन्यवृष्टी ही संतुलित प्रमाणात होण्यासाठी व दुष्काळ अगर अतिवृष्टी होऊ नये या साठी व या काळात होणारी रोगराई दूर व्हावी यासाठी देवीला प्रार्थना केली जाते. हा सण बागेचा सण म्हणून संपूर्ण महाराष्ट्र मध्ये प्रसिद्ध असून महाराष्ट्र मध्ये ज्या ज्या ठिकाणी पदमशाली समाजातील लोक राहतात त्या त्या ठिकाणी त्यांचे सोयीने हा सण मोठया उत्साहात साजरा केला जातो. तसेच ज्यांना वृक्षारोपण साठी रोपे नसतील त्यांनी मला संपर्क करावे त्यांना विनामूल्य रोपांची व्यवस्था केली जाईल तसेच अहिल्यानगर महानगरपालिकेचे उपमहापौर धनंजय जाधव यांनीही विनामूल्य रोपे पुरवू असे आश्वासन दिले असल्याची माहिती मा. नगरसेविका सौ. वीणा बोज्जा यांनी दिली.

# ५१३ व्या पुण्यतिथीनिमित्त पैठणात संत भानुदास महाराजांना भावपूर्ण अभिवादन

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**पैठण–** दक्षिण काशी म्हणून प्रसिद्ध असलेल्या श्रीक्षेत्र पैठण येथील नाथ मंदिरात राष्ट्रीय संत वैष्णववीर श्री. भानुदास महाराज यांची ५१३ वी पुण्यतिथी आषाढ शुद्ध चतुर्दशी निमित्त भक्तिभावात साजरी करण्यात आली. यावेळी भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून संत भानुदास महाराजांना अभिवादन केले.



कार्यक्रमाची सुरुवात विजयी पांडुरंग व संत भानुदास महाराजांच्या मूर्तीच्या महाभिषेकाने झाली. चंद्रशेखर महाराज गोसावी यांच्या हस्ते, तर पुरोहित नागेश उपाध्ये यांच्या मंत्रोच्चारात हा धार्मिक विधी पार पडला. त्यानंतर भाविकांनी संत भानुदास महाराजांचा जयघोष करत प्रतिमेवर पुष्पवृष्टी केली.

यावेळी अनिल गर्गे यांनी भजने व भारुडे सादर करून भक्तिमय वातावरण निर्माण केले. कार्यक्रमास स्वानंद म. गोसावी, सर्वज्ञ म. गोसावी, छय्या म. गोसावी, मेघश्याम म. गोसावी, अथर्व म. गोसावी, हरीपंडित म. गोसावी, ज्ञानराज म. गोसावी यांच्यासह अनेक भाविक उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी अशोक कुलकर्णी, शिवाजी तुपे, श्रीरंग मडके, अमोल कुलकर्णी, दिनेश पारीख, महादू गिरणीवाले, सुधाकर पगार, प्रल्हाद चरण, गोरक्ष शिंदे, विजयकुमार जोशी, गणेश औताडे आणि रविंद्र कोरान्ने यांनी परिश्रम घेतले. इतिहासानुसार, संत भानुदास महाराजांचा जन्म इ.स. १४४८ मध्ये पैठण येथे झाला. त्यांनी कर्नाटकातील अनागोंदी येथून श्री विठ्ठल-पांडुरंगाची मूर्ती पुन्हा पंढरपूरात आणून कार्तिकी एकादशी, इ.स. १५०६ रोजी पुनःप्रतिष्ठापना केली. त्यानंतर इ.स. १५१३ मध्ये पंढरपूर येथे त्यांनी समाधी घेतल्याचे मानले जाते.

# गुरु पौर्णिमेला गुलमोहर रोडवरील स्वामी समर्थ मंदिरात भाविकांची मांदियाळी स्वामींच्या दिव्य वस्तू दर्शनाचा भाविकांसह महापौर ज्योतीताई गाडे यांनी घेतला लाभ

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** सावेडी उपनगरातील गुलमोहर रोडवरील प्रती अक्कलकोट असलेल्या श्री स्वामी समर्थ मंदिरात गुरुपौर्णिमेला भाविकांची मांदियाळी झाली.यावेळी महाराजांच्या दिव्य वस्तूंच्या दर्शनाचा हजारो भाविकांनी लाभ घेतला.



गुरुपौर्णिमे निमित्त मंदिरात श्री गुरु लीलामृत पारायण सोहळा पार पडला. गुरु पौर्णिमेला पहाटे श्रींच्या मूर्तीस रुद्राभिषेक करण्यात आला.यावेळी नगरसेवक विलास नाकाडे - शितल नाकाडे या दांपत्यांनी महापूजा करून अभिषेक केला. दुपारी श्री स्वामी याग संपन्न झाला. यावेळी होम हवन पूजा किरण वाकडमाने - तनुजा वाकडमाने अजित अकोलकर - सुवर्णा अकोलकर या दांपत्यांच्या हस्ते करण्यात आली. दर्शनासाठी भाविकांनी सकाळपासूनच गर्दी केली होती. मंदिराच्या सेवेकर्यांनी सर्व भाविकांना प्रसादाचे वाटप केले.

अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ महाराजांच्या अंगावरील व नित्य वापरातील मणी, गळ्यातील माळ व कंठी कानातील - गळ्यातील रुद्राक्ष, नित्य पूजेतील शिवलिंग अशा दिव्य वस्तूं दर्शनासाठी ठेवण्यात आल्याने त्याचा हजारो भाविकांनी लाभ घेतला. अहिल्यानगरच्या महापौर सौ.ज्योतीताई गाडे यांनी या दिव्य वस्तूंचे दर्शन घेतले यावेळी वैभव भारती महाराज यांनी या वस्तूंचे महत्त्व सांगितले.

स्वामींच्या दर्शनासाठी अहिल्यानगरचे आ.संग्राम जगताप यांच्या मातोश्री पार्वतीबाई जगताप धर्मपत्नी शितलताई जगताप आले होते. भाविकांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. तरी स्वामीभक्त स्वयंबद्ध, शिस्तबद्ध पद्धतीने गडबड गोंधळ न करिता रांगेत उभे होते. याचे जगताप परिवाराने कौतुक केले.

# जनसेवा सप्ताहाचा समारोप; मूकबधिर विद्यार्थ्यांना भोजनदान

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**पैठण–** महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त पैठण तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातर्फे आयोजित जनसेवा सप्ताहाचा समारोप समाजोपयोगी उपक्रमाने करण्यात आला. समारोपानिमित्त पैठण येथील ओमकार मूकबधिर विद्यालय आश्रमात विद्यार्थ्यांना भोजन देण्यात आले.

हा उपक्रम आमदार सतीश भाऊ चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच तालुका व शहर राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने आयोजित करण्यात आला. यावेळी पैठण विधानसभा अध्यक्ष विनोद तांबे पाटील, विलास भैया शेळके, जिल्हाध्यक्ष अनिल हजारे, सदा मोटकर, यश राजपूत, योगेश जोशी आदी पदाधिकारी उपस्थित होते.



कार्यक्रमास ओमकार मूकबधिर विद्यालयातील सर्व शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. उपस्थितांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत समाजोपयोगी उपक्रमांना प्राधान्य देण्याचा निर्धार व्यक्त केला.

# पैठण पोस्टाच्या ७ गुंठे जागेचे सीमांकन; दोन दशकांपासूनचे अतिक्रमण हटविण्याची तयारी

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**पैठण–** पैठण शहरातील नेहरू चौक परिसरात असलेल्या टपाल विभागाच्या सुमारे सात गुंठे शासकीय जागेचे महसूल विभागाच्या मदतीने सीमांकन करण्यात आले आहे. गेल्या सुमारे २० वर्षांपासून या जागेवर अतिक्रमण असल्याने आता ते हटविण्याच्या हालचालींना वेग आला आहे.

सोमवारी सायंकाळी टपाल विभाग व भूमी अभिलेख विभागाच्या अधिकाऱ्यांनी संयुक्तपणे जागेची मोजणी करून अधिकृत सीमारेषा निश्चित केली. मोजणीदरम्यान अतिक्रमित क्षेत्राची नोंद करण्यात आली. सद्यस्थितीत या जागेची किंमत सुमारे दोन कोटी रुपये असल्याचे सांगितले जात आहे. सीमांकन पूर्ण झाल्यानंतर अतिक्रमण हटविण्याची प्रशासकीय प्रक्रिया सुरू होणार असून त्यामुळे अतिक्रमणधारकांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली आहे. दीर्घकाळापासून शासकीय जागेवर सुरू असलेल्या अतिक्रमणामुळे टपाल विभागाला अडचणींचा सामना करावा लागत होता.

या कारवाईदरम्यान टपाल विभागाचे वरिष्ठ अधिकारी, सहाय्यक पोस्टमास्तर तसेच भूमी अभिलेख विभागाचे अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते. प्रशासनाकडून लवकरच अतिक्रमण हटविण्याची पुढील कार्यवाही केली जाणार असल्याचे संकेत मिळत आहेत.

# क्लेरा ब्रुस मैदानावरील न्यायप्रविष्ठ जागेत सामाजिक वनीकरण विभागावर मनमानी कारवाईचा आरोप

## शिवसेना सामाजिक न्याय विभागाचा आंदोलनाचा इशारा

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** शहरातील क्लेरा ब्रुस बॉईज हायस्कूल मैदानावरील जागेचा वादात सामाजिक वनीकरण विभागाच्या अधिकाऱ्यांवर गंभीर आरोप करण्यात आले आहेत. संबंधित जागेवर अनेक वर्षांपासून उदरनिर्वाहाचे साधन उभे करणारे स्टीफन दिलीप पंचमुख यांनी कोणतीही कायदेशीर नोटीस किंवा पूर्वसूचना न देता त्यांचे दुकान, गोठा, पत्र्याचे शेड, लोखंडी पिंजरे यांसह सर्व बांधकामे जमीनदोस्त करण्यात आल्याचा आरोप केला आहे. तसेच त्यांच्या ताब्यातील जनावरे आणि विविध जातींच्या कुत्र्यांना परस्पर ताब्यात घेऊन काही जनावरे बेपत्ता झाल्याचा गंभीर आरोपही त्यांनी केला आहे.

या प्रकरणाबाबत सहाय्यक वनसंरक्षक एस. ए. केसरकर यांनी यापूर्वी चौकशी सुरू असून १५ दिवसांत अहवाल सादर केला जाईल, असे लेखी आश्वासन दिले होते. मात्र त्यानंतरही कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. या संपूर्ण प्रकरणात झालेल्या आर्थिक नुकसानीची भरपाई मिळावी, संबंधित अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्यात यावा आणि संपूर्ण घटनेची निष्पक्ष चौकशी करावी, अशी मागणी शिवसेना सामाजिक न्याय विभागाच्या वतीने करण्यात आली आहे. अन्यथा १५ ऑगस्ट पासून नाशिक विभागीय आयुक्त कार्यालया समोर उपोषण करण्याचा इशारा देण्यात आला आहे.



या मागणीचे निवेदन निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गीते यांना देण्यात आले. यावेळी शिवसेना सामाजिक न्याय विभागाचे जिल्हाप्रमुख विनोद साळवे, छावा संघटनेचे प्रदेश कार्याध्यक्ष रावसाहेब काळे, तक्रारदार स्टीफन पंचमुख, शिवसेना सामाजिक न्याय विभागचे जिल्हा सचिव विजय लोंढे, नंदीवाले तिरुमल समाजाचे नेते सुभाष काकडे, धडक कामगार संघटनेचे जिल्हाप्रमुख श्रीधर शेलार, मुक्ता शेडाळे, दिपक कांबळे, आकाश पंचमुख, गोपाळ मालपाणी, केवल भिंगारे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

स्टीफन पंचमुख यांनी दिलेल्या माहितीनुसार, क्लेरा ब्रुस बॉईज हायस्कूल परिसरातील संबंधित जागा वाईडर चर्च मिनिस्ट्रीज या संस्थेने २२ नोव्हेंबर २०१४ रोजी त्यांना ९९ वर्षांच्या करारावर उदरनिर्वाहाचे साधन निर्माण करण्यासाठी वापरण्यास दिली होती. त्यानंतर त्यांनी त्या ठिकाणी पत्र्याचे शेड, जनावरांसाठी गोठा, विविध जातींच्या कुत्र्यांसाठी लोखंडी पिंजरे तसेच छोटे दुकान उभारले.

# वेदांतनगरमधील श्रीदत्त देवस्थानमध्ये गुरूपौर्णिमेस भाविकांची अलोट गर्दी

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** येथील प्रेमदान चौकामधील वेदांतनगरमधील प.पू.श्री रामकृष्ण क्षीरसागर महाराजांच्या दर्शनासाठी गुरूपौर्णिमेस भाविकांनी अलोट गर्दी केली होती. भारतभरासह अमेरिका येथून आलेल्या गुरूबंधू-भगिनींनी गुरूदेवांचे दर्शन घेत श्रीदत्तक्षेत्रमधील श्री सद्गुरू अधिष्ठान मंडपात गुरूचरणी लीन होण्यातील धन्यता अनुभवली.



गुरूपौर्णिमा उत्सवाच्या पूर्वसंध्येला देवस्थान मधील श्री महालक्ष्मी मंडपात कायम विश्वस्त श्री.मिलिंद क्षीरसागर यांच्या हस्ते पाठशाळेतील सर्व विद्यार्थ्यांना नवीन वस्त्रांची भेट देण्यात आली. श्रीदत्तक्षेत्रमधील श्रीदत्तात्रेय निवास, भगवान श्रीदत्तात्रेय मंदिर, प.पू. गुरूदेवांचे अधिष्ठान आणि तपोवन रोडवरील प.पू.श्रीगुरूदेवांचे स्मृतीमंदिर विविध फुलांनी आकर्षकरित्या सजविले होते. केळीचे खुंट, तोरणे आणि रंगीत सुरेख रांगोळ्या भाविकांचे लक्ष वेधून घेत होत्या.

श्री दत्तात्रेय निवास येथे पहाटेच्या महापूजेनंतर श्री महाराजांच्या आज्ञेने आणि परंपरेने पवित्र वातावरणामध्ये श्री व्यासपूजन संपन्न झाले.

श्रीमन् नृसिंह सरस्वती तपोवन येथील स्मृतीमंदिराच्या गर्भगृहात श्रीगुरूपादुकांवर लघुविष्णू अभिषेक वेदांत विद्यापीठातील विद्यार्थी आणि गुरूजी यांचेकडून करण्यात आला. याचवेळी श्रीदत्तक्षेत्रमधील भगवान श्रीदत्तात्रेय मंदिराचे गर्भगृहात लघुविष्णू अभिषेक सोहळा संपन्न झाला. पहाटे ५ वाजता अभिषेक सोहळ्याचा शुभारंभ करण्यात आला. सकाळी ८ वाजता मंदिराच्या गर्भगृहात व्यासपूजा करण्यात आली. सकाळी ९ वाजता वेदांत विद्यापीठ मधील विद्यार्थ्यांनी पाठशाळेतील अध्यापकांचे गुरूपूजन केले. यावेळी वेदान्त विद्यापीठाच्या वेद विभागाचे प्रधान अध्यापक वेदमूर्ती श्री. समीहन कोल्हटकर गुरूजी, ऋग्वेद विभागातील अध्यापक वेदमूर्ती श्री.अनंत चानसीकर, वेदमूर्ती श्री.भानुदास जोशी, वेदमूर्ती श्री.निलेश जोशी, अथर्ववेद विभागातील अध्यापक वेदमूर्ती श्री.गजानन कुलकर्णी, सामवेद विभागातील अध्यापक वेदमूर्ती श्री. शिवानंद माळेगांवकर, शुक्ल यजुर्वेद विभागातील अध्यापक वेदमूर्ती श्री. योगानंद माळेगांवकर, कृष्ण यजुर्वेदाचे अध्यापक वेदमूर्ती श्री.अजिंक्य दीक्षित गुरुजी हे उपस्थित होते. दुपारी १२ वाजता सामुदायिक महाआरती होवून उपस्थित भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

दुपारी ३.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत श्री महालक्ष्मी मंडपात प.पू. श्रीगुरूदेवांची पाद्यपूजा गुरूदेवांचे घराण्यातील श्री. महेंद्र क्षीरसागर, कोथरूड सत्संग अध्यक्ष श्री.आशिष बेडेकर, पिंपरी-चिंचवड सत्संग अध्यक्ष श्री. मंदार भावे यांच्या हस्ते भक्तीपूर्ण वातावरणात संपन्न झाली. या सोहळ्यामध्ये २५ सत्संग मंडळांचे प्रतिनिधी सहभागी झाले होते. पाद्यपूजा झाल्यावर पू.पू. गुरूदेवांनी दिलेल्या दृकश्राव्य आशीर्वाद श्रवणाचा लाभ सर्वांनी घेतला. पसायदानाने पाद्यपूजा सोहळ्याची सांगता करण्यात आली. उत्सव समितीचे अध्यक्ष श्री. आर.जे.जाधव यांनी या भावपूर्ण सोहळ्याचे सूत्रसंचालन केले. श्री दत्तात्रेय निवास, भगवान श्रीदत्तात्रेय मंदिर आणि स्मृतीमंदिर या स्थळी भाविकांनी अत्यंत शिस्तबध्दरितीने रांगा लावून शांतपणे दर्शनाचा आनंद घेतला.

देवस्थानचे कायम विश्वस्त श्री.मिलिंद क्षीरसागर, उत्सव समिती अध्यक्ष श्री. आर जे जाधव, समितीचे सदस्य सर्वश्री गणेश पंडित, नैनेश पाटणकर, दिपक कानडे, संजय सोनार, दिलीप बोडके, वसंत पाटील, प्रसाद पुराणिक, शैलेश काळे, ऋषिकेश हिरवे, दिगंबर धारूरकर, सर्व सत्संग मंडळांचे अध्यक्ष, पदाधिकारी, सभासद कार्यकर्ते, आणि देवस्थानचा कर्मचारी वृंद या सर्वांनीच गुरूपौर्णिमा सोहळ्याच्या यशस्वितेसाठी अथक परिश्रम घेतले. गुरूबंधू आणि गुरूभगिनींनी श्रध्देने गुरूपौर्णिमा सोहळ्यात सहभागी होवून गुरूसेवेचा आनंद घेत या सोहळ्यात आपापल्यापरिने योगदान दिले.

## श्री संत सावता महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त उत्सव समितीच्यावतीने

# ५ ऑगस्ट पासून अखंड हरिनाम सप्ताह

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** श्री संत सावता महाराज पुण्यतिथीनिमित्त उत्सव समितीच्यावतीने माळीवाडा येथे भव्य अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले. त्याच्या मंडप उभारणी कामाचा शुभारंभ उत्सव समितीचे अध्यक्ष छबु नाना जाधव यांच्या हस्ते झाला. याप्रसंगी उत्सव समितीचे कैलास खरपुडे, सतीश डागवाले, सुभाष राऊत, बाळासाहेब पुंड, चंद्रकांत ताठे, अनिल चेडे, सोमनाथ नागापुरे , विकास पटवेकर, बजरंग भुतारे, अशोक कापरे, अमोल धाडगे, सागर जाधव, विनायक आंबेकर, भाऊसाहेब पुंड, सुनिल राऊत, सुनिल पडोळे, रमेश बनकर ,विष्णुपंत म्हस्के ,बापूसाहेब शिंदे ,पोपट शिंदे ,नितीन शेरकर ,रमेश चिपाडे ,चंद्रकांत म्हस्के ,बापू आरडे ,संतोष मेहेत्रे ,महेश सांगळे ,भास्कराव बोठे ,बाळासाहेब रडे ,मोहित चोधरी ,नाना आरे ,अभिषेक खंदारे आदि उपस्थित होते.



या सप्ताह विषयी माहिती देतांना अध्यक्ष छबुनाना जाधव म्हणाले गेल्या २० वर्षांपासून माळीवाडा येथे श्री संत सावता महाराज पुण्यतिथीनिमित्त या अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात येत असते. त्यात महाराष्ट्रातील अनेक नामवंत किर्तनकार आपली सेवा या ठिकाणी देत असतात. यानिमित्त नागरिकांमध्ये धार्मिकतेची गोडी लागण्यास मदत होते. मंडळाच्या सदस्यांसह अनेकांच्या सहकार्याने हा सप्ताह कायम यशस्वी होतो. यंदाही सप्ताहाची जंगी तयारी करण्यात आली असून, आज मंडप उभारणीने त्याची सुरुवात केली आहे. बुधवार दि.०५ ऑगष्ट ते बुधवार दि.१२ ऑगष्ट पर्यंत होणार्या या सप्ताहाचा भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन छबूनाना जाधव यांनी केले.

या सप्ताहाचा शुभारंभ बुधवार दि. ०५ ऑगष्ट रोजी सकाळी ११ वा. मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलनाने होईल. त्यानंतर रात्री ८ वा. हभप हरीशरण गिरीजी (रामदरबार आश्रमठान ,वैजापूर ) यांचे किर्तन होईल. दि.०६ रोजी रात्री ८ वा. हभप प्रा प्रभू महाराज माळी (अरण भेंडी ), दि.०७ रोजी हभप स्वप्निल महाराज गिरडकर (समाजप्रबोधनकार ,जळगाव ) , दि.०८ रोजी हभप भगवान महाराज इसादकर (गंगाखेड ), दि ०९ रोजी हभप गुलाब महाराज खालकर (रामायणाचार्य), दि.१० रोजी हभप सागर महाराज बोराटे (नातेपुते ), दि.११ रोजी दुपारी ४ ते ७ यावेळेत दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. आणि रात्री ८ वाजता हभप भागवत महाराज उंमरेकर (वृद्धेश्वर संस्थान ) यांचे किर्तन होईल.

# महिला सक्षम झाली तर कुटुंब, समाज आणि राष्ट्र सक्षम होते– प्रिया जानवे

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त महिलांच्या सक्षमीकरणाचा अनोखा उपक्रम

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त समाजोपयोगी उपक्रम राबविण्याचा आदर्श सावेडी परिसरात पाहायला मिळाला. मुख्यमंत्री फडणवीस यांनी महिलांच्या सक्षमीकरणाला प्राधान्य देत महिला शेतकरी विधेयक मंजूर करण्यास पुढाकार घेतल्याच्या पार्श्वभूमीवर त्याच विचारांना अनुसरून भाजप महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्षा प्रिया जानवे यांच्या पुढाकारातून मॅक्सकेअर आणि भाजप महिला मोर्चाच्या संयुक्त विद्यमाने महिलांसाठी मोफत सर्वसमावेशक आरोग्य तपासणी शिबिर आणि टेरेस गार्डन किट वाटप कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या उपक्रमाला परिसरातील महिलांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला.

कार्यक्रमामध्ये महिलांच्या आरोग्याची विशेष काळजी घेण्यात आली. हृदयविकाराचा धोका लक्षात घेऊन ईसीजी (), रक्तदाब (), रक्तातील साखरेची तपासणी ( ), तसेच महिलांमधील स्तनाच्या कर्करोगाचे लवकर निदान होण्यासाठी एसओएस मॅमोग्राफी ( ) अशा विविध वैद्यकीय तपासण्या मोफत करण्यात आल्या. तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली प्रत्येक महिलेची आरोग्य तपासणी करून आवश्यक वैद्यकीय सल्लाही देण्यात आला. महिलांमध्ये वाढत्या जीवनशैलीजन्य आजारांबाबत जनजागृती करण्याचे कामही या शिबिरातून करण्यात आले.

आरोग्य शिबिरात डॉ. तृप्ती मोरे, डॉ. राहुल माटे आणि त्यांच्या वैद्यकीय सहकाऱ्यांनी अत्यंत संयमाने व तज्ज्ञतेने तपासण्या केल्या. प्रत्येक महिलेच्या आरोग्याविषयी सविस्तर माहिती देत योग्य आहार, नियमित व्यायाम, वेळेवर तपासणी आणि आवश्यक उपचारांचे महत्त्व त्यांनी समजावून सांगितले. महिलांनीही या शिबिराचा लाभ घेत डॉक्टरांशी विविध आरोग्यविषयक प्रश्नांवर चर्चा केली. अनेक महिलांनी अशा प्रकारचे शिबिर नियमितपणे आयोजित करण्याची अपेक्षा व्यक्त केली.

याच कार्यक्रमात पर्यावरण संवर्धन आणि घरगुती पोषणाचा संदेश देण्यासाठी महिलांना टेरेस गार्डन किटचे वाटप करण्यात आले. कमी जागेतही सेंद्रिय पद्धतीने भाजीपाला, फळे व औषधी वनस्पतींची लागवड करता यावी, कुटुंबाला रसायनमुक्त अन्न मिळावे आणि पर्यावरण संवर्धनात महिलांचा सहभाग वाढावा, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. सुनिल दौंड आणि ॲड. अर्चना दौंड यांनी टेरेस गार्डनची संकल्पना, लागवडीच्या पद्धती, सेंद्रिय खतांचा वापर, पाण्याची बचत आणि घरच्या घरी पौष्टिक भाजीपाला कसा तयार करता येईल याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे महिलांमध्ये घरगुती शेतीबाबत विशेष उत्साह निर्माण झाला.

यावेळी बोलताना भाजप महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्षा प्रिया जानवे म्हणाल्या, ''मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त आम्ही केवळ शुभेच्छा देऊन थांबायचे नाही, तर त्यांच्या विकासाभिमुख आणि समाजकेंद्री विचारांना कृतीत उतरविण्याचा संकल्प केला आहे.

# राज्यस्तरीय स्केटिंग शर्यतीत अहिल्यानगर जिल्ह्याचा डंका

## विजेतेपदाची पटकाविली ढाल; ८ वर्षीय आरुष कांबळेची उत्कृष्ट कामगिरी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** बारामती येथे पार पडलेल्या अत्यंत चुरशीच्या राज्यस्तरीय स्केटिंग शर्यतीत अहिल्यानगर जिल्ह्याने प्रथम क्रमांक पटकावून ६ फुटांची भव्य व मानाची विजेतेपदाची ढाल पटकाविली. या स्पर्धेत अहिल्यानगरच्या खेळाडूंनी सुवर्ण, रौप्य आणि कांस्य पदकांची कमाई करत जिल्ह्याचे वर्चस्व सिद्ध केले. या यशामध्ये अहिल्यानगरचा अवघ्या ८ वर्षांचा गुणवंत खेळाडू आरुष प्रविण कांबळे याने ८ वर्षांखालील गटात चमकदार कामगिरी करत कास्य पदक पटकावून जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

आरुष कांबळे हा अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयातील आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे सहायक महसूल अधिकारी प्रविण अंबादास कांबळे आणि स्वाती प्रविण कांबळे यांचा मुलगा आहे. अत्यंत बालवयात आरुषने या खेळात दाखवलेले कौशल्य आणि मिळवलेले हे यश सर्वांसाठीच अभिमानास्पद ठरले आहे. आई स्वाती यांचे या यशा मागे मोलाचे योगदान असल्याचे आरुष सांगतो.

महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतून आलेल्या शेकडो नामांकित खेळाडूंमध्ये आरुषने अत्यंत कौशल्याने आणि जिद्दीने कामगिरी करत हे यश मिळवले आहे. या यशामागे अहिल्यानगर स्केटिंग संघटनेचे अध्यक्ष गोरख धात्रक यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. तसेच मार्गदर्शक केदार सर, आदित्य पालवे आणि सर्व पालकांनी घेतलेली मेहनत या यशाची मुख्य शिल्पकार ठरली.

अहिल्यानगर जिल्ह्याच्या या ऐतिहासिक विजयाबद्दल आणि बालखेळाडू आरुष कांबळे याच्या यशाबद्दल महाराष्ट्र राज्य संघटनेचे अध्यक्ष आशिष दहिफळे यांनी सर्व खेळाडू, मार्गदर्शक व पालकांचे अभिनंदन केले. तसेच राज्य सरकारी कर्मचारी संघटनेचे सरचिटणीस रावसाहेब निमसे, अध्यक्ष सुभाष तळेकर व उपाध्यक्ष अशोक मासाळ यांनी समस्त महसूल परिवार आणि राज्य सरकारी कर्मचारी संघटनेच्या वतीने बालखेळाडू आरुष कांबळे याचे विशेष कौतुक करून त्याला भविष्यातील उज्ज्वल वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# केडगावच्या सरस्वती विद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२६–२७ मधील पहिली पालक सभा उत्साहात

## विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी एआय शिक्षण, संस्कार आणि आरोग्यपूर्ण जीवनशैलीवर भर– डॉ. प्रसाद उबाळे

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** केडगाव येथील सरस्वती विद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२६–२७ मधील पहिली पालक सभा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. या सभेला पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून आयुर्वेदाचार्य डॉ. प्रसाद उबाळे हे होते, तर अध्यक्षस्थानी डॉ. हेडगेवार शिक्षण संस्थेचे सहकार्यवाह डॉ. रवींद्र चोभे उपस्थित होते. यावेळी संस्था समन्वयक डॉ. गोकुळदास लोखंडे, आरोग्य भारतीचे डॉ. राजेश परदेशी, श्रीपाद शिंदीकर, कैलास चोथे आणि सामाजिक कार्यकर्ते अनिल झिरपे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

प्रास्ताविकात विद्यालयाचे मुख्याध्यापक संदीप भोर यांनी सांगितले की, शाळा आणि पालक यांच्यातील समन्वय विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी अत्यंत महत्त्वाचा असल्याचे सांगितले. यंदाच्या शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती त्यांनी दिली. बदलत्या काळानुसार विद्यालयात बुद्धिमत्ता () आधारित अध्यापनाला प्राधान्य देण्यात आले असून विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाशी जोडण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

तसेच मंथन प्रज्ञाशोध, शिष्यवृत्ती परीक्षा, स्कॉलरशिप, इंडियन नॅशनल ऑलिम्पियाड, नवोदय प्रवेश परीक्षा, विविध स्पर्धा परीक्षा यांच्या माध्यमातून विद्यालयाचा गुणवत्ता आलेख अधिक उंचावण्यासाठी पालकांनीही सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले.

प्रमुख अतिथी आयुर्वेदाचार्य डॉ. प्रसाद उबाळे यांनी आपल्या मार्गदर्शनात पालकांची भूमिका ही मुलांच्या भविष्यासाठी अत्यंत महत्त्वाची असल्याचे सांगितले. मुलांची नियमित दिनचर्या, संतुलित व पौष्टिक आहार, चांगले संस्कार, शिस्तबद्ध जीवनशैली आणि सकारात्मक कौटुंबिक वातावरण यांचा त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासावर मोठा प्रभाव पडतो, विद्यार्थ्यांनी केवळ गुणांच्या स्पर्धेत न अडकता आपल्या आवडीनुसार करिअरची दिशा निवडावी, त्यासाठी पालकांनी मुलांशी सातत्याने संवाद साधून त्यांना योग्य मार्गदर्शन करावे, असेही त्यांनी सांगितले.

अध्यक्षीय भाषणात डॉ. रवींद्र चोभे यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षणाबरोबरच मैदानी खेळ, व्यायाम, संस्कार आणि महिला सक्षमीकरणाची जाणीव महत्त्वाची असल्याचे प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्मिता खिलारी यांनी केले, मुख्याध्यापक संदीप भोर यांनी आभार मानले. सभेला शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# साहित्यिक सीए डॉ. प्रा. शंकर अंदानी यांच्या 'भाऊवरील १०१ कविता' काव्यसंग्रहास ग.दि. माडगूळकर उत्कृष्ट काव्य संग्रह पुरस्कार प्रदान

## निमगाव वाघा साहित्य संमेलनात गौरव । १२ हजारांहून अधिक कविता; अंदानी यांच्या साहित्यसेवेचा गौरव



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** मराठी आणि हिंदी साहित्य क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण करणारे साहित्यिक तथा सीए (डॉ.) प्रा. शंकर घनशामदास अंदानी यांच्या 'भाऊवरील १०१ कविता' या काव्यसंग्रहाला 'ग.दि. माडगूळकर उत्कृष्ट काव्य संग्रह पुरस्कार' प्रदान करण्यात आला. स्व. पै. किसनराव डोंगरे बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

आषाढी एकादशी आणि राजर्षी छत्रपती शाहू महाराज जयंतीचे औचित्य साधून निमगाव वाघा (ता. नगर) येथे आयोजित करण्यात आलेल्या 'जगतगुरू संत तुकाराम महाराज राज्यस्तरीय सातवे ग्रामीण मराठी साहित्य संमेलन' या सोहळ्यात उद्योजक तथा माजी जिल्हा परिषद सदस्य माधवराव लामखडे आणि सेवानिवृत्त पोलीस उपनिरीक्षक रतिलाल चौधर यांच्या हस्ते सीए (डॉ.) प्रा. शंकर अंदानी यांना मानपत्र आणि सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाला स्वागताध्यक्ष ॲड. आनंद सूर्यवंशी, संमेलनाचे संयोजक पै. नाना डोंगरे, सामाजिक कार्यकर्ते अशोक सूर्यवंशी, अनिताताई खरात, विशेष सरकारी वकील ॲड. सुरेश लगड, उद्योजक दिलावर शेख, निमगाव वाघा सोसायटीचे चेअरमन अतुल फलके, मुख्याध्यापक उत्तम कांडेकर, डॉ. विजय जाधव, भाऊसाहेब ठाणगे यांच्यासह साहित्यप्रेमी, कवी, लेखक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सीए (डॉ.) प्रा. शंकर अंदानी यांनी गेल्या अनेक वर्षांपासून मराठी आणि हिंदी साहित्य क्षेत्रात सातत्यपूर्ण आणि विक्रमी साहित्यनिर्मिती करून स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या साहित्यिक कारकिर्दीत अनेक अभूतपूर्व विक्रमांची नोंद झाली असून, एकाच दिवशी तब्बल १०६ स्वलिखित पुस्तकांचे प्रकाशन करण्याचा जागतिक विक्रम त्यांच्या नावावर नोंदविण्यात आला आहे. याशिवाय 'आई' या विषयावर आधारित ५,१२१ कवितांचा जगातील सर्वात मोठा हिंदी काव्यसंग्रह प्रकाशित करण्याचा मानही त्यांनी मिळविला आहे. आजवर त्यांनी लिहिलेल्या १२ हजार १०० हून अधिक कवितांचे विविध ग्रंथांमधून प्रकाशन झाले असून, या साहित्यनिर्मितीची स्वतंत्र जागतिक विक्रम म्हणून नोंद करण्यात आली आहे.

मराठी साहित्य समृद्ध करण्यासाठी त्यांनी अनेक वैशिष्ट्यपूर्ण संकलने प्रकाशित केली आहेत. 'वडील : बाबा अबोल जीवनाचे कोडे' या शीर्षकाखाली महाराष्ट्रातील ८० कवींच्या १,१६१ कवितांचे भव्य संकलन त्यांनी प्रकाशित केले. त्यानंतर 'बहिण माझी प्रिय ताई' या नावाने बहिणीवरील १,१६१ कवितांचा स्वतंत्र काव्यसंग्रह प्रकाशित करून कौटुंबिक नातेसंबंधांवरील साहित्याला नवे परिमाण दिले. त्याच परंपरेत 'भाऊवरील १०१ कविता' या काव्यसंग्रहातून त्यांनी भाऊ–बहिण आणि भावांमधील जिव्हाळा, प्रेम, आपुलकी, नात्यांची उब आणि भावनिक बंध यांचे प्रभावी शब्दांकन केले आहे. या साहित्यकृतीतील आशय, भावस्पर्शी मांडणी आणि सामाजिक मूल्यांची दखल घेत त्यांना यंदाचा ग.दि. माडगूळकर काव्य पुरस्कार प्रदान करण्यात आला.

सीए (डॉ.) प्रा. अंदानी यांच्या साहित्यिक कार्याची दखल लंडन बुक ऑफ रेकॉर्ड्स आणि इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स यांसारख्या प्रतिष्ठित आंतरराष्ट्रीय संस्थांनीही घेतली असून, त्यांच्या नावावर विविध जागतिक विक्रमांची नोंद आहे. साहित्यसेवेबरोबरच त्यांनी समाजसेवेचीही भक्कम परंपरा जपली आहे.

# अहिल्यानगरमध्ये ३१ जुलै रोजी छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिराचे आयोजन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अपर तहसील कार्यालयाच्यावतीने शुक्रवार, दि. ३१ जुलै २०२६ रोजी सकाळी १० वाजता लक्ष्मीनारायण मंगल कार्यालय, स्वस्तिक चौक, अहिल्यानगर येथे छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर आयोजित करण्यात आले आहे. नागरिकांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहून या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील यांनी केले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या जन्मदिनानिमित्त तसेच माजी उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त आयोजित या शिबिरात आमदार संग्राम जगताप यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. या अभियानाचा उद्देश महसूल विभागांतर्गत क्षेत्रीय स्तरावर ग्रामीण भागातील सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, विद्यार्थी व महिला यांच्या महसूल विभागाशी संबंधित दैनंदिन प्रश्नांचे निराकरण करणे, तक्रारींचा सत्वर निपटारा करणे तसेच महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम व गतिमान करणे हा आहे.

विधानसभा मतदारसंघनिहाय राबविण्यात येत असलेल्या या अभियानातून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या लोककल्याणकारी राज्यकारभाराचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून जनतेचे दैनंदिन प्रश्न स्थानिक पातळीवरच निकाली काढणे आणि प्रशासकीय सेवा अधिक गतिमान करणे अपेक्षित आहे. या समाधान शिबिराच्या माध्यमातून महसूल विभाग, पुरवठा विभाग, आरोग्य विभाग, नोंदणी व मुद्रांक विभाग, पशुसंवर्धन विभाग, पंचायत समिती, कृषी विभाग, भूमी अभिलेख विभाग तसेच विविध महामंडळे, संस्था आणि इतर शासकीय विभागांशी संबंधित नागरिकांची कामे एकाच ठिकाणी करण्यात येणार आहेत. विविध दाखले व प्रमाणपत्रे मिळविण्यासाठी नागरिकांना शासकीय कार्यालयांचे फेरे मारावे लागू नयेत, यासाठी सर्व प्रमुख विभागांचे स्टॉल उभारण्यात येणार असून विविध शासकीय सेवा थेट नागरिकांना उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. अहिल्यानगर (शहर) विधानसभा मतदारसंघ क्रमांक २२५ मधील सर्व नागरिकांनी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहून या महसूल समाधान शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहनही श्री. पाटील यांनी केले आहे.

# बेकायदा विदेशी दारूचा साठा जप्त; श्रीगोंदा तालुक्यातील आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**


**बेलवंडी–** बेलवंडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत बेकायदा विदेशी दारूचा साठा विक्रीच्या उद्देशाने बाळगणाऱ्या एका व्यक्तीविरुद्ध बेलवंडी पोलिसांनी महाराष्ट्र प्रोहिबिशन कायद्यान्वये गुन्हा दाखल केला आहे. या कारवाईत विविध कंपनीच्या विदेशी दारूच्या बाटल्या जप्त करण्यात आल्या असून, जप्त मुद्देमालाची किंमत २४,५३० इतकी आहे.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, महेश सोपान राजत याच्याकडे विक्रीसाठी बेकायदा विदेशी दारूचा साठा असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार करण्यात आलेल्या कारवाईत विविध कंपनीच्या विदेशी दारूच्या बाटल्या जप्त करण्यात आल्या. आरोपी हा श्रीगोंदा तालुक्यातील रहिवासी असून, त्याच्याविरुद्ध महाराष्ट्र प्रोहिबिशन कायदा कलम ६५ (ई) अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

या प्रकरणाची फिर्याद राज्य उत्पादन शुल्क विभागाचे मानाजी साबळे यांनी दिली आहे. त्यानुसार बेलवंडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. जप्त करण्यात आलेल्या विदेशी दारूच्या बाटल्या विक्रीसाठी बेकायदा साठवून ठेवल्याचा आरोप आरोपीवर आहे. या प्रकरणाचा पुढील तपास बेलवंडी पोलीस ठाण्याचे पोलीस कर्मचारी सुरेखा वलवे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असून, आरोपीच्या दारू पुरवठ्याचे स्रोत तसेच या अवैध व्यवसायात इतर कोणाचा सहभाग आहे का, याचाही तपास पोलीस करीत आहेत. दरम्यान, अवैध दारू विक्री व साठवणुकीविरोधात बेलवंडी पोलिसांनी कारवाईचा धडाका सुरू ठेवला असून, अशा प्रकारच्या बेकायदा धंद्यांवर कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले आहे.

# गुरुंबद्दल कृतज्ञता व्यक्त करत गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी

## सहावीच्या विद्यार्थींनी एकांकितुन सांगितले मोबाईलचे तोटे



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**बेलवंडी–** श्रीगोंदा तालुक्यातील देवदैठण येथील श्री संतश्रेष्ठ निंबराज महाराज विद्याधाम प्रशालेमध्ये विद्यार्थ्यांनी गुरुंबद्दल कृतज्ञता व्यक्त करत गुरुपोर्णिमा मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली .

संगीत शिक्षक संदीप वेताळ व स्वरगंधार गीतमंच यांनी सुरेल आवाजात ओंकार स्वरुपा सद्गुरु समर्था या गीताने कार्यक्रमाची सुरेख सुरुवात केली .इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांनी सर्व गुरुंना पेन सप्रेम भेट दिला .गुरुंबद्दल आपली कृतज्ञता व्यक्त करताना अक्षदा जाधव, स्वरांजली होळकर ,आरोही कौठाळे, गुंजाळ, आदित्य बनकर, आराध्या शिंदे, प्राची औटी यांनी मनोगत व्यक्त केले.

इयत्ता सहावीमधील विद्यार्थीनींनी एकांकीका सादर करत मोबाईल वापरणारे अभ्यास न करणारे विद्यार्थी , बेशिस्त वागणारे विद्यार्थी यांच्या डोळ्यात झणझणीत अंजन घातले. शिक्षक एकनाथ वायळ, राजेंद्र जगताप पर्यवेक्षक नामदेव डुंबरे , मुख्याध्यापक पी. ज. मेरगळ यांनी गुरुपौर्णिमा का साजरी केली जाते याविषयी माहिती सांगितली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन एम. एम. बनकर यांनी केले. तर आभार अमोल कातोरे यांनी मानले.मुख्याध्यापक पी. जे. मेरगळ, पर्यवेक्षक नामदेव डुंबरे व सर्व शिक्षकवृंद उपस्थित होते.

(पान १ वरून)

# सरपंच शरद पवार यांना उच्च न्यायालयाच्या संभाजीनगर खंडपीठाकडून जामीन मंजूर

आरोपांना आधार देणारे पुरावे अपुरे असल्याचा दावा त्यांनी केला. या प्रकरणात प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, वैद्यकीय पुरावे, कथित खंडणीची देवाणघेवाण किंवा इतर भौतिक पुरावे उपलब्ध नसल्याचा युक्तिवादही त्यांनी न्यायालयात मांडला.

बचाव पक्षाने फिर्यादीने यापूर्वी शरद पवार यांच्याविरोधात धमकी दिल्याची तक्रार पोलीस ठाण्यात करण्यात आल्याचा तसेच या संपूर्ण प्रकरणामागे राजकीय हेतू असल्याचा दावा देखील न्यायालयासमोर मांडला.

दरम्यान, न्यायालयाने दोन्ही बाजूंचा युक्तिवाद विचारात घेत शरद पवार यांना जामीन मंजूर केला. या सुनावणी वेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी व खासदार निलेश यांचे समर्थक हायकोर्ट येथे मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी खासदार निलेश लंके यांनी संसदीय पावसाळी अधिवेशनातून दिल्ली येथून सरपंच पवार व नागरगोजे व पवारयांचे वकिलांचे अभिनंदन केले.

# खोटी ॲट्रॉसिटी दाखल करून अडकविण्याचा प्रयत्न; निष्पक्ष चौकशीची शाकीर शेख यांची मागणी

कोणी तयार केला आणि फिर्यादीसोबत आणखी कोण उपस्थित होते, याची फुटेज, स्टेशन डायरी आणि भेट नोंदवहीच्या आधारे चौकशी करण्याची मागणीही करण्यात आली आहे. नाशिक उपोषणाच्या संदर्भातील पूर्वीची तक्रार, तिचा मसुदा, स्टेशन डायरी नोंदी, व्हॉट्सॲप संदेश, ई–मेल व संबंधित पत्रव्यवहार मागवून दोन्ही तक्रारींमध्ये परस्पर संबंध आहे किंवा नाही, याची वरिष्ठ अधिकाऱ्यामार्फत स्वतंत्र चौकशी करावी. तपास पूर्ण होईपर्यंत घाईघाईने अथवा एकतर्फी कठोर कारवाई करू नये, असे शेख यांनी म्हटले आहे. ''माझा भारतीय संविधान, सामाजिक समता आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांवर पूर्ण विश्वास आहे. कोणत्याही जाती किंवा समाजाचा अपमान करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. निष्पक्ष तपास झाल्यास माझ्याविरुद्ध दाखल करण्यात आलेली ॲट्रॉसिटीची फिर्याद खोटी आणि पूर्वनियोजित असल्याचे स्पष्ट होईल,'' असा दावा शेख यांनी केला आहे. चौकशीत फिर्याद खोटी अथवा बनावट असल्याचे निष्पन्न झाल्यास संबंधितांविरुद्ध कायद्यानुसार कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. निवेदनाच्या प्रती विशेष पोलीस महानिरीक्षक, नाशिक परिक्षेत्र, पोलीस उपअधीक्षक तथा तपासी अधिकारी आणि कोतवाली पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षकांना देण्यात आल्या आहेत.

# छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्याचे आपला मावळाचे कार्य प्रेरणादायी – किरण काळे

राम वाणी, राम झिने, महिला आघाडीच्या नलिनी गायकवाड, उषा भगत, शैला लांडे, वेणूबाई वाणी, रजनी ताठे, सामाजिक कार्यकर्ते संतोष घरवाढवे, विकेश गुंदेचा, सागर चाबुकस्वार, चंद्रकांत उजागरे, सचिन नवघिरे, शंकर आव्हाड, गणेश आपरे, राम धोत्रे, आकाश अल्हाट, विकास भिंगारदिवे, ग्रामीण अल्पसंख्यांक आघाडीचे जिल्हाध्यक्ष युनूसभाई शेख, महावीर मुथा, किशोर कोतकर, आप्पा लांडगे, बाबासाहेब वैरागर, जयराम आखाडे, सुमित चव्हाण उपस्थित होते. किरण काळे म्हणाले, खा.डॉ. निलेश लंके यांच्या नेतृत्वाखाली आपला मावळा संघटना राज्यभर गडकिल्ल्यांचे संवर्धन, स्वच्छता आणि इतिहास जतन करण्यासाठी उल्लेखनीय काम करत आहे. रामभाऊ झिने हे युवकांसाठी सातत्याने कार्य करणारे आणि सामाजिक बांधिलकी जपणारे कार्यकर्ते आहेत. त्यांची संघटनेच्या शहराध्यक्षपदी झालेली निवड गड, किल्ले संवर्धन उपक्रमाला अधिक बळकटी देईल. राम झिने म्हणाले, अहिल्यानगर शहरातील शाळा, महाविद्यालये आणि युवकांमध्ये गडकिल्ल्यांच्या संवर्धनाबाबत जनजागृती करण्यासाठी माझा प्रयत्न राहील. महाराजांचा इतिहास, गडकिल्ल्यांचे संवर्धन आणि सामाजिक बांधिलकी जपण्याच्या या मोहिमेत सर्वांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन यावेळी त्यांनी केले.

# नगर शहर परिसरातून दुचाकी लांबवणारा सराईत चोरटा जेरबंद

परिसरातून चोरलेल्या ९ मोटारसायकली जप्त करण्यात आल्या. पुढील तपास सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक राकेश खेडकर करत आहेत.पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी शिरीष वमने यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि हेमंत थोरात, सफौ. राकेश खेडकर, पोहेकॉ शैलेश रोहोकले, पोकों दिपक फुंदे व नवनाथ दहिफळे यांच्या पथकाने ही कारवाई केली.